संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
आणि
श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

# तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग

आणि

# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २३ व २४ जानेवारी २०२०

-: विषय :-

## भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती

**स्थळ**

**"राजवाडा"**

देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

**आयोजक**

समाजशास्त्र विभाग

तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

# Takshashila Mahavidyalaya, Amravati

## Department of Sociology & Marathi Samaj Shashtra Parishad

**Organised**

**TWO DAY NATIONAL CONFERENCE**

**ON**

**HUNDRED YEARS OF SOCIOLOGY IN INDIA**

**ISBN : 978-81-941195-4-8**

**Publication :** Shabdkanti Prakashan, Amravati.

**Owner :** Secretary, Shri. Dadasaheb Gawai Charitable Trust, Amravati

**Published By :** Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravtai.

**Printed By :** Atharv Graphics, Amravati

**Patron**

Dr. Kamlatai R. Gawai, Founder President, SDGCT, Amravati.
Mrs. Kirtitai Rajesh Arjun, President, SDGCT, Amravati.

**Adviory Board**

Prof. P. R. S. Rao, Secretary, SDGCT, Amravati.
Dr. Padwal Mallu, Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravati
Dr. Saroj Aglawe, President Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Dipak Pawar, Secretary, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Rahul Bhagat, Treasurer, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. K. M. Akotkar.
Dr. P. R. Abhyankar.
Dr. Daya Pande.
Prof. Nandkishor Raut.
Dr. Sanjay Bhagat.
Dr. Pradip Ambore.
Prof. Sandip Hadole.

**Editor :** Dr. Anjali R. Wath.

**Board of Editor :** Prof. Pritesh Patil.
Prof. Pravin Wankhade
Prof. Sachin Pandit.

**Cover Page Design :** Gajanan Dhole

**Type Setting :** Atharv Graphics Amravati,

**Date of Publication :** Thurday, 23rd January, 2020

**Note :** 1) The Souvenir is for private distribution only. 2) The Editor and the Board of Editors may or may not agree with the thoughts of the writers in case of authenticity of their paper.

[All the rights are reserved by Publication.]

| | | | |
|---|---|---|---|
| 97 | भारतातील सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. आमरिन एस. गावंडे | 450 |
| 98 | भारतीय स्त्री चळवळी: एक आढावा | डॉ. सौ. मंगला दि. तांबेकर | 457 |
| 99 | वृद्धाश्रम व्यवस्था : समाजशास्त्रीय अभ्यास | सौ. सुवर्णा भारत कऱ्हाडे | 462 |
| 100 | डॉ. इरावती कर्वे यांचे समाजशास्त्रीय योगदान | प्रा. आनंद गो. मनवर | 468 |
| 101 | आधुनिक काळातील भारतीय समाजशास्त्रज्ञां समोरील आव्हाने | प्रा.डॉ. अनिल बी. वानखडे | 473 |
| 102 | **भारतीय समाजात समाजशास्त्राचाविकास आणि महत्त्व** | **प्रा. डॉ.ज्ञानेश्वर तुळशीराम शेंडे** | 476 |
| 103 | बदलती कुटूंबसंस्था आणि समाजशास्त्राची उपयोगिता: एक विश्लेषण | डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे. | 480 |
| 104 | भारताच्या सामाजिक परीवर्तनामध्ये समाजशास्त्र शिक्षणाची उपयोगीता | प्रा. किशन काशिनाथ घोगरे | 486 |
| 105 | मराठी समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्रातील योगदान | प्रा. डॉ. संजय जे. भगत | 489 |
| 106 | सद्यस्थितीतील समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हाने | डॉ. दया पांडे | 493 |
| 107 | वर्तमान सामाजिक संशोधन आणि भारतीय समाजशास्त्रासमोरील आव्हान | डॉ. अंजली र. वाठ | 498 |
| 108 | आपत्ती व्यवस्थापनाची समकालीन सामाजिक समस्या | प्रा. डॉ. गणेश एन. बहादे | 501 |

# डॉ. इरावती कर्वे यांचे समाजशास्त्रीय योगदान

प्रा. आनंद गो. मनवर
समाजशास्त्र विभाग
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती

---

प्रस्तावना:

प्राचीन मानवी समाजाचे सर्वच देशात अध्ययन करण्यात आले. प्रत्येक देशातील विचारवंतानी आपआपल्या देशातील समाजाबद्दल अध्ययन करुन विविध प्रकारचे विचार मांडलेले आढळुन येतात. लिखानाची कला अवगत झाल्यानंतर त्या त्या देशातील समाजजीवनाबद्दल ग्रंथ लिहण्यात आले या प्राचीन ग्रंथावरुन त्या देशातील प्राचीन समाजाविषयीची माहिती उपलब्ध होते. प्रसिध्द ग्रिक विचारवंत प्लेटो (इ.स.पुर्व ४२७—३४७) Republic या ग्रंथात सामाजीक घडामोडीचा विचार करुन नागरी समुहाच्या विविध अंगाचे विश्लेषन केले आहे. ॲरिस्टॉटल यांनी (इ.स.पुर्वी ३८४—३२२) नितीशास्त्र आणि राज्यशास्त्र समाज आणि राज्य कायदा यावर सविस्तर चर्चा आढळते. भारतातही प्राचीन काळात शिक्षणाचा बराच विकास झाला होता. नालंदा, तक्षशिला या सारखी जगप्रसिध्द विद्यापिठे आणि ग्रंथालये भारतात होती. भारतीय समाजाच्या संदर्भात बरेच ग्रंथ लिहण्यात आले होते. हिंदु, बौध्द, जैन साहित्यात तत्कालीन समाजाच्या संदर्भात आपले स्वतंत्र विचार माडलेले आढळुन येतात.[१]

अशा प्रकारे प्राचीन काळापासुन समाज जीवनाचे अध्ययन अनेक शास्त्रज्ञांनी व धर्म ग्रंथामध्ये केलेले दिसुन येते परंतु या अभ्यासाला शास्त्रीय किंवा वैज्ञानिक दर्जा प्राप्त झाला नव्हता खऱ्या अर्थाने समाजशास्त्राचा वैज्ञानिक दृष्टीकोनातुन अभ्यास करण्याची सुरवात फ्रेंच विचारवंत ऑगस्ट कॉम्त यांनी १८३० पासुन समाजाचा वैज्ञानिक पध्दतीने आणि स्वतंत्र अभ्यास विषयक समजुन अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. व्याख्याने व लेख लिहण्यास प्रारंभ केला.[२]

भारतीय समाजाच्या अभ्यासाची पाळेमुळे ब्रिटीश राजवटीत रुजली गेली ब्रिटीश शासक व इंग्रजी शिक्षण घेतलेले समाज सुधारक राजाराम मोहन रॉय, प. ईश्वरचंद्र विद्यासागर पासुन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी भारतीय समाजाचे अध्ययन केले. याच काळात भारतात अर्थशास्त्र व सामाजीक मानवशास्त्राचा विकास झाला यातुन भारतीय समाजाच्या स्वतंत्र शास्त्रीय अध्ययनाची गरज भासली व समाजशास्त्राच्या अध्यापनाची महत्ता पटली व समाजशास्त्राची औपचारिक प्रतिस्थापना झाली.[३]

मानवी समाजाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न पाश्चात्य समाजशास्त्राज्ञांनी १९ व्या शतकापासुनच केला आहे. तथापी भारतीय समाजाचा वैज्ञानीक पध्दतीने अभ्यास करण्याची सुरवात २० व्या शतकात झाली. भारतीय समाजव्यवस्था, भारतीय सामाजीक संस्था व संघटना, भारतीय सामाजीक समस्या, आदिवासी ग्रामीन नागरी लोकांचे जीवन, जातीव्यवस्था, दारिद्रय, रुढी प्रथांचे प्राबल्य, ग्रामीन समुदायाची अभीसत्ता इ. त्यामुळे भारतातील अनेक विचारवंताचे लक्ष त्याच्या अध्यनाकडे आकर्षीत झाले व अनेक विचारवंतानी सामाजीक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्नही केले. वैज्ञानिक पध्दतीने भारतीय समाजाचा अभ्यास प्रामुख्याने केला त्यामध्ये डॉ. जी.एस.धुर्वे, डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ.राधाकमल मुखर्जी, डॉ.ए.आर. देसाई, डॉ. इरावती कर्वे, डॉ.के.एम. कापडीया इत्यादी समाजशास्त्रज्ञाचा उल्लेख महत्वाचा ठरतो. अर्थात या सर्वामध्ये डॉ. जी.

ISBN No. : 978-81-941195-4-8

एस.धुर्वे हे पहिले भारतीय समाजशास्त्रज्ञ होत. भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणुन डॉ. जी.एस.धुर्वे यांचा उल्लेख करावा लागतो.४

### डॉ. इरावती कर्वे यांचे समाजशास्त्रीय योगदान

डॉ. इरावती कर्वे या समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ आणि मराठी वाडमयातील लेखीका म्हणुन महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत समाजशास्त्रीय संशोधन अध्ययनामुळे भारतात आणि परदेशामध्येही त्यांना नावलौकीक मिळाला. त्यांनी लिहिलेली परिपुर्ती, भोवरा आणि युगांत ही तीन पुस्तके मराठी साहीत्यात प्रसिध्द आहेत.

डॉ. इरावती कर्वे यांचा जन्म ब्रम्हदेशातील म्यिजान या गावी १५ डिस. १९६५ रोजी झाला. त्यांच बि.ए. पर्यतचे शिक्षण रॅंग्लर परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथे झाले त्यांनी एम.ए. परिक्षेसाठी डॉ.घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील चितपावन ब्राम्हण या विषयावर संशोधन प्रबंध लिहिला. दोन वर्षानी जर्मनीमधील बर्लीन विद्यपिठात "मनुष्याच्या डोळयाच्या कवटीची नेहमीची असमप्रमाणता" या विषयावर प्रबंध पुर्ण करुन पीएच.डी ची पदवी मिळवीली. डॉ. इरावती कर्वे यांचा विवाह समाजसुधारक धोंडो केशव कर्वे यांच्या कुळात झाला सुरवातीचे दोन वर्ष एस.एन.डी.टि. विद्यापिठात कुलसचीव म्हणुन कार्य केले. नंतर पुण्यातील डेक्कन महाविद्यालयात समाजशास्त्र आणि मानवशास्त्र विषयाच्या प्रपाठक म्हणुन कार्य केले. त्यांनी लंडन विद्यापिठामध्येही प्रपाठक म्हणुन कार्य केले. इरावती कर्वे यांनी महाराष्ट्रातील विभिन्न जातीच्या स्त्री पुरुषाचे शारीरिक मानवशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला. या अभ्यासामध्ये त्यांनी महाराष्ट्रातील विभिन्न जाती संस्थेचे वांशिक लक्षणे स्पष्ट केली आहे. संशोधन अध्ययनाच्या निमित्ताने त्यांनी संपुर्ण महाराष्ट्र व भारतात बरेच भ्रमण केले. त्यांनी महाराष्ट्रातील गावाच्या नावाचे समाजशास्त्रीय दृष्टया अभ्यास करुन एक लेख लिहीला आहे. माणसे निसर्ग आणि गोतावळा यांचा अभ्यास करण्यात त्यांना रस होता. अनेक वर्षाच्या अथक प्रयत्नाने व चिंतनाने डॉ. इरावती कर्वे यांची प्रज्ञा 'महाराष्ट्र एक अभ्यास' या ग्रंथातुन व्यक्त होते.

१. संस्कृती :

संस्कृतीचे अध्ययन अनेक सामाजिक शास्त्रामध्ये केले जाते. संस्कृती हा सामाजिक मानवशास्त्राचा अध्ययनाचा प्रमुख विषय आहे. संस्कृतीचे अध्ययन आणि संस्कृतीची व्याख्या करताना सामाजिक मानवशास्त्रात संस्कृतीच्या भौतिक अंगावर विशेष असा भर दिला जातो. या उलट समाजशास्त्रात संस्कृतीचे अध्ययन व व्याख्या करताना अभौतीक अंगावर अधिक भर दिला जातो. यामुळे संस्कृतीच्या अर्थाबाबत सर्वसामान्यांचा गोंधळ उडतो. डॉ. इरावती कर्वे यांनी संस्कृतीचे अध्ययन करताना सामाजीक मानवशास्त्रीय दृष्टीकोन आणि सामाजिक दृष्टीकोन यांच्यामध्ये समन्वय निर्माण केला. उदा. संस्कृतीची व्याख्या करतांना त्या म्हणतात " मनुष्य समाहजाची डोळयांना दिसनारी भौतिक वस्तुरुप निर्मीती व डोळयांना न दिसनारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. " अशा प्रकारे संस्कृतीचे अध्ययन करण्यामधील डॉ. इरावती कर्वेचे योगदान महत्वपुर्ण मानले जाते.

संस्कृतीची लक्षणे विषद करतांना डॉ. इरावती कर्वे म्हणतात " संस्कृती समाजाची असते व्यक्तीची नव्हे. व्यक्तीमध्ये संस्कृती साकारते पण कोणताही व्यक्ती कोणत्याही संस्कृतीचे स्वरुप पुर्णाशाने दाखवु शकत नाही संस्कृतीला व्यक्तीनिरपेक्ष असे एक निराळेच व स्वतंत्रपुर्ण जीवन असते."

ISBN No.: 978-81-941195-4-8

साहचर्याने मानवसंस्कृतीची परंपरा निर्माण होते. पशुपक्षी व किटक आपआपली सांस्कृतीक परंपरा का निर्माण करु शकली नाही? यांचे सुरेख स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. त्या म्हणतात " मानसाच्या बाबतीत दोन पिढयांचे साहचर्य अन्य कोणत्याही प्राण्यापेक्षा जास्त असते. माणसाची शरीर रचना, रुप व बरेच गुण त्यांच्यामध्ये शरीर परंपरेने आलेले असतात. पण जीवनाचे सर्व व्यवहार वरील (मागच्या) पिढीपासुन शिकावे लागतात. माणसाचे पोर फक्त आपल्या आईच्या संगतीत न वाढता इतर कित्येक सजातीयासोबत वाढते. दोन पिढयांचे साहचर्य व त्यात एकीकडुन दुसरीला ज्ञान संक्रमणाची क्रिया हा सर्व मानवी संस्कृतीचा पाया आहे."

संस्कृतीच्या वैशिष्टयावर आणि पैलूवर सहजगत्या प्रकाशझोत टाकतात उदा. ' मानवाच्या वस्तुरुप संस्कृतीचे एक मोठे वैशिष्ट म्हणजे ती व्यक्तीच्या मरणावरोबर नष्ट होत नाही. ' मानवाने निर्माण केलेल्या सर्व बाबी मागे ठेवुनच त्याला जावे लागते. अगदी हयाच गोष्टीमुळे संस्कृतीचे जतन संक्रमन व संवर्धन शक्य होते. उदा. मुलगा वडीलाकडुन विभिन्न वस्तु व अवजारे अभौतिक कशी तयार करावी हे शिकतो. तसेच त्याला भौतिक व अभौतिक संस्कृतीचे गाटोडे मागच्या पिढीपासुन प्राप्त होत असते.

संस्कृतीचे संक्रमण होण्यासाठी भाषा ही एक आवश्यक अशी गोष्ट आहे. भाषा हा संस्कृतीचा एक आवश्यक घटक आहे हे स्पष्ट करतांना त्या म्हणतात ' पशु ध्वणीने त्यांची भावना सुचित करतात. वस्तु नाही. ध्वणी समुह म्हणजे अमकी वस्तु अशा संकेत उत्पन्न झाला म्हणजे भाषा निर्माण होते. भाषेमुळे नुसत्या विशिष्ट वस्तु बद्दलच नव्हे तर एकंदर वस्तुवर्गाबद्दलही बोलता येते. मनुष्य पाहतो ते फक्त स्वतःच्या दोन डोळयांनी नव्हे तर सर्व मनुष्य जातीच्या डोळयांनी पाहीलेले व भाषेने सांगीतलेले पाहत असतो.'

डॉ. इरावती कर्वे यांच्या मते ' वस्तुरुप संस्कृती आणि मनोमय संस्कृती ही संस्कृतीची दोन अंगे परस्पर विरुध्द नसुन परस्पर पुरक आहेत. मनोमन संस्कृती वस्तुरुप निर्मीतीमुळे दृढरुप व दृढमुल होते मनोमय संस्कृतीचे ज्ञान अथवा कल्पना आल्याशिवाय द्रव्यरुप संस्कृतीचे कार्यच कळत नाही. भाषा ही जो पर्यत नुसती बोली असते, लिपी ने अक्षर बध्द नसते तो पर्यंत तिचे जीवीन धोक्याचे असते ज्या मानव समाजात भाषेला लिपी नाही. त्यांची भाषा आणि तिच्या बरोबर संस्कृती ही पिढया दोन पिढयात नष्ट झाल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. थोडक्यात इरावती कर्वे यांनी भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती या संस्कृतीच्या दोन्ही अंगाचे वा प्रकाराचे महत्व सांगितले आहे.

२. आप्तसंबंध संघटन :

भारतीय समाजशास्त्रात आप्तसंबंध संघटनेचे अध्ययन करणाऱ्यामध्ये डॉ. इरावती कर्वे हया एक प्रमुख अभ्यासक होय. भारतातील आप्त संबंध संघटक हे पुस्तक १९५३ मध्ये प्रकाशीत केले. आप्त संबंध व्यवस्थेचे अध्ययन हे कुटुंबाच्या समाजशास्त्रीय अध्ययनासाठी आवश्यक आहे हे स्पष्ट करतांना त्या म्हणतात. कोणत्याही समाजातील कुटुंबव्यवस्था समजण्यासाठी पुढील गोष्टी समजण्याची आवश्यकता आहे. निकटवर्तीय कुटुंबीय कोण? व दुरचे कुटुंबीय कोण? एकंदर नातेवाईक मंडळीचे एकमेकांशी संबंध कश्या प्रकारे असतात? नाते वाचक शब्द काय असतात?

. इरावती कर्वे यांच्यामते आप्त संबंध संज्ञा व आप्तसंबंध चालीरीती यांचा जवळचा संबंध आहे. मराठी भाषीक प्रांतातील आप्तसंबंध संज्ञा व आप्तसंबंध चालीरीती च्या पाहणीत त्यांना असे आढळुन आले की, मातृसत्ताक कुटूंब पध्दती आणि आतेमामे भावंडाचा विवाह यांचा जवळचा संबंध आहे.

ISBN No. : 978-81-941195-4-8

अशा सर्वासाठी डॉ. इरावती कर्वे याच '' मराठी लोकांची संस्कृती '' हे पुस्तक उपयुक्त ठरते, असे म्हणता येईल.

भारत व महाराष्ट्रातील चार हजार वर्षापासुनच्या व्यापारी दळणवळणच्या मार्गाचे वर्णन करतांना डॉ.इरावती कर्वे म्हणतात व्यापाराचे मार्ग म्हणजे मानवी संस्कृतीच्या देवघेवीचे मार्ग होत.

संदर्भ ग्रंथ सुची :


१. डॉ. आगलावे प्रदिप – पाश्चात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञ साईनाथ प्रकाशन, नागपुर.

२. लोटे रा.ज. व डॉ. चव्हान ए.डी. – समाजशास्त्र परिचय (२००८) पिंपळापुरे ऑफ पब्लीशर्स , नागपुर

३. प्रा. डोईफोडे ज्योती (२००९) – समाजशास्त्राची रुपरेषा विद्याणुक पब्लीशर्स, औरंगाबाद

४. प्रा. गजेंद्र व्हि.एन., प्रा. घुगरे एस.बी. (१९८०) – समाजशास्त्रीय विचारांचे अंतरंग, घुगरे प्रकाशन, कोल्हापुर

५. लोटे रा.ज. (२००६) – सुलभ समाजशास्त्र सेठ पब्लीकेशर्स, मुंबई.